अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींची स्मारक बांधणे तसेच ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाच्या स्थळांचा विकास करणे या योजनेअंतर्गत शांतीवन चिंचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीअल व कल्चरल ट्रेनिंग सेंटर येथील म्युझियम बिल्डींगच्या इंटेरीअर व अनुषंगिक बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: सान्यावि-२०२५/प्र.क्र. १४०/बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ डिसेंबर, २०२५.

वाचा :-
1) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०११/प्र.क्र.५२/मावक-७, दि.१४.०३.२०११
2) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०११/प्र.क्र.६१/बांधकामे, दि.३०.३.२०१२
3) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सान्यावि-२०१७/प्र.क्र.६२/बांधकामे, दि.११.४.२०२३
4) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/बांधकामे, दि.५.११.२०२०.
5) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे दिनांक ०८.१२.२०२५ रोजीचे पत्र क्र. सकआ/मावक/ऐति.स्थळ/२०२५-२६/का-१२/२७६०.
6) महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दिनांक ०८.१२.२०२५ रोजीचे पत्र क्र. का.अ.(प्र.)/८००.

प्रस्तावना :-

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तिंचे स्मारके बांधणे तसेच अनुसूचित जातीसाठी सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे व अनुसूचित जातीच्या सांस्कृतिक व नितीमुल्यांवर आधारित विकास साधणाऱ्या प्रकल्पांसाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीची निकष व नियमावली (लेखाशीर्ष २२२५ ३६३६) या योजनेंतर्गत शांतीवन चिंचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीअल व कल्चरल ट्रेनिंग सेंटर येथील म्युझियम बिल्डींग इंटेरीअरच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव उचित कार्यवाहीस्तव संदर्भाधीन क्र.६ दि.०८.१२.२०२५ अन्वये शासनास सादर केला होता. विदर्भ विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २००९-१० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी स्व. वामनराव गोडबोले यांच्या चिंचोली येथील जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वस्तुसंग्रहालयाचे आधुनिकीकरण, ट्रेनिंग सेंटर, संरक्षण भिंत इत्यादी बांधकामांसाठी संदर्भ क्र.१ व २ अन्वये प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरीत करण्यात आलेला आहे. आता

शांतीवन, चिंचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीअल व कल्चरल ट्रेनिंग सेंटर येथील म्युझियम बिल्डींगच्या इंटेरीअर व अनुषंगिक बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तिंचे स्मारके बांधणे तसेच अनुसूचित जातीसाठी सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे व अनुसूचित जातीच्या सांस्कृतिक व नितीमुल्यांवर आधारित विकास साधणाऱ्या प्रकल्पांसाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीची निकष व नियमावली (लेखाशीर्ष २२२५ ३६३६ नवीन लेखाशिर्ष २२२५ G ४१२) या योजनेंतर्गत शांतीवन, चिंचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीअल व कल्चरल ट्रेनिंग सेंटर येथील म्युझियम बिल्डींगच्या इंटेरीअर व अनुषंगिक बांधकामास रू.१४,४५,५२,३९७/- (अक्षरी रु. चौदा कोटी पंचेचाळीस लक्ष बावन्न हजार तीनशे सत्याण्णव फक्त) इतक्या रकमेच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) शांतीवन, चिंचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीअल व कल्चरल ट्रेनिंग सेंटर येथील म्युझियम बिल्डींगच्या इंटेरीअर व अनुषंगिक बांधकाम सुरू करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास संबंधित वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे.

२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ता.क्र.१, दि.१० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) विस्तृत अंदाजपत्रकावर उपभोक्ता विभागाच्या वतीने प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर यांचे साक्षांकन आवश्यक आहे.

५) सदर बांधकामासाठी कार्यान्वयीन यंत्रणा ही नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर राहील.

६) सदर प्रकल्पाचे/वास्तुचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर इमारतीवर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा १०० टक्के अनुदानातून निर्माण करण्यात आले आहे, त्याप्रमाणे इमारतीच्या प्रवेश व्दारावर उपरोक्त बाबीचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

७) शांतीवन, चिंचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीअल व कल्चरल ट्रेनिंग सेंटर येथील म्युझियम बिल्डींगच्या इंटेरीअर व अनुषंगिक बांधकाम करण्याकरीता या प्रकल्पावर सनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी संयुक्तपणे प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण नागपूर व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची राहील.

८) सदर वास्तुचे हस्तांतरण इतर संस्थेला करता येणार नाही किंवा जागेची व वास्तुची खरेदी- विक्री करता येणार नाही.

९) सदर वास्तुचा उपयोग व्यापारी तत्वावर करता येणार नाही.

१०) शासनाच्या कार्यक्रमासाठी वा उपक्रमासाठी उपरोक्त वास्तुचा विनाशुल्क उपयोग करता येईल.

११) प्रस्तावित बांधकामाची जागा सदर संस्थेच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

२. सदर प्रकल्पाचे कामकाज शासकीय नियमातील तरतूदीस अनुसरून तात्काळ सुरू करण्याची कार्यवाही नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी करावी.

३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला निधी उपरोक्त कामावर खर्च झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर यांनी विहित मार्गाने शासनास सादर करावे.

४. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांनी प्रकल्पाच्या बांधकामाच्या सद्यस्थितीचा त्रैमासिक अहवाल आणि वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व आयुक्त, समाजकल्याण पुणे यांना वेळीच सादर करण्याची दक्षता घ्यावी.

५. सदर लेखाशिर्ष २२२५ G ४१२ अंतर्गत सहायक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सहायक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांनी मंजूर निधी आहरीत करून तो महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर यांच्याकडे सुपूर्द करावा. तसेच योजनेंतर्गत मंजूर निधीचे वितरण हे संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयातील अटीच्या अधीन राहून काटेकोरपणे करण्याची जबाबदारी सहायक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांची राहील.

६. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका,१९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अ.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४(१) खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेले अधिकारी व झालेल्या निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१२१४१४१८२४८९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

HARSHADEEP SHRIRAM KAMBLE
Digitally signed by HARSHADEEP SHRIRAM KAMBLE
Date: 2025.12.14 14:49:35 +05'30'

(डॉ. हर्षदीप कांबळे)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/विधानपरिषद, विधानमंडळ,मुंबई
४. मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर.
६. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे
७. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर
८. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर
९. सहाय्यक आयुकत, समाजकल्याण विभाग, नागपूर
१०. अध्यक्ष, भारतीय बौद्ध परीषद, शांतीवन, चिंचोली, नागपूर
११. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
१२. निवड नस्ती (बांधकामे)